महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम
जिल्हा - कोल्हापूर

# श्री क्षेत्र वाडीरत्नागिरी येथील श्री जोतिबा चैत्र पौर्णिमा यात्रेच्या काळात अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक सुचना

# कृती प्रक्रिया आराखडा

(Standard Operating Procedure)

सत्यमेव जयते

गृह मंत्रालय , भारत सरकार

मदत आणि पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती धोके व्यवस्थापन नियंत्रण कक्ष ,**

**जिल्हाधिकारी कार्यालय , कोल्हापूर**

**दूरध्वनी क्र. ०२३१-२६५९२३२**

**किंवा टोल फ्री क्र. - १०७७**

# प्रस्तावना

कोल्हापूर जिल्हयाचे मुख्यालयाच्या पश्चिमेस २२ कि.मी. अंतरावर पन्हाळा तालुक्याचे मुख्यालय आहे. पन्हाळयाला जाणे करीता कोल्हापूर रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावरुन १५ कि.मी. अंतरावर वाघबीळ या ठिकाणी फाटा फुटतो. तेथून पुढे पन्हाळा ७ कि.मी. अंतरावर आहे. तहसिल मुख्यालय पन्हाळा गडावर असले तरी तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र मुख्यालयाचे चारही दिशांना आहे. पन्हाळा तालुक्याच्या पूर्वेला श्री जोतिबा देवस्थान मौजे वाडी रत्नागिरी येथे डोंगरावर वसलेले आहे. दरवर्षी चैत्र पौर्णिमेला जोतिबा डोंगर येथे मोठी यात्रा भरते. जोतिबा डोंगर पन्हाळा मुख्यालयापासून १२ कि.मी. आणि कोल्हापूर पासून १८ कि.मी. अंतरावर आहे.

सन २००१ च्या जनगणनेनुसार वाडीरत्नागिरी येथील लोकसंख्या ४३०१ इतकी आहे. चैत्र पौर्णिमेच्या यात्रेला महाराष्ट्रातून व इतर राज्यातून सुमारे ६ ते ७ लाख भाविक देवदर्शनासाठी येतात. सदर यात्रेच्या नियोजनासाठी प्रशासनाच्या वतीने यात्रा काळातील स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन करणेच्या अनुषंगाने कृती प्रक्रिया आराखडा तयार केला आहे. यात्रा काळात जीवितहानी व वित्तहानी टाळणेच्या अनुषंगाने संबंधीत विभागांवर जबाबदारी निश्चित करणेत आलेली आहे.

**राजाराम माने** भा. प्र. से.
**जिल्हाधिकारी, कोल्हापूर.**

# ❑ अनुक्रमणिका ❑


१. महसुल विभाग

२. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती

३. पोलीस विभाग

४. अग्निशमन विभाग,महानगर पालिका, कोल्हापूर

५. अग्निशमन विभाग,मलकापूर नगरपरिषद, मलकापूर

६. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर

७. अन्न व औषध विभाग

८. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

९. सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर

१०. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पन्हाळा

११. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

१२. ग्रामिण पाणीपुरवठा विभाग

१३. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विभाग

१४. राज्य उत्पादन शुल्क विभाग

# जोतिबा यात्रेच्या काळात विविध खात्याकडून पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या -

# कृती प्रक्रिया आराखडा

# (Standard Operating Procedure)

**शासन परिपत्रक क्र.:आरएलएफ-२००९ / प्र.क्र.५८ / म-३,**
**दिनांक २३ मार्च, २००९ मधील सूचनेचे काटेकोरपणे पालन करावे.**

## महसूल विभाग -

- जोतिबा येथील यात्रेच्या वेळी पन्हाळा उपविभागीय अधिकारी हे जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली समन्वयक अधिकारी (Nodal Officer) म्हणून काम करतील. त्यांनी यात्रेसाठीची पूर्वतयारी म्हणून सर्व शासकिय विभागाकडून व पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती कडून तयारी करून घ्यावी.

❖ **खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे तहसिलदार पन्हाळा यांची आहे.**

- यात्रेपूर्वी सर्व तालुका व जिल्हा स्तरीय यंत्रणेचे नियोजन व आढावा बैठक आयोजीत करून नियोजना प्रमाणे कार्यवाही केली आहे की नाही याबाबत वरिष्ठ अधिकारी यांना वेळोवेळी अहवाल देणे.

- जोतिबा मंदिर येथील प्रवेश व बाहेर पडणेच्या मार्गावरील पाय-यांवर कोणतीही दुकाने ठेवण्यात येऊ नयेत. तसेच, येण्या-जाण्यासाठीचा मार्ग पूर्णत: मोकळा ठेवावा.

- जोतिबा मंदिरात जेथे नारळ किंवा तेल मुर्तीवर घालण्यात येते आणि त्या ठिकाणच्या परिसरात तेल पसरुन त्यावरून घसरण्याची शक्यता असेल अशा परिस्थितीत पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती कडून नारळ अगर तेल घालण्यासाठी मुर्तीजवळ एक स्थान निश्चित करावे. तेथे भक्तांकडून त्यांचे नारळ व तेल घालण्यात यावे. मंदिराच्या कोणत्याही परिसरात किंवा पायरीवर घसरण्यासारखा पदार्थ पसरु नये याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष दयावे.

- यात्रेपूर्वी यात्रेच्या ठिकाणी ग्रामपंचायत कार्यालय वाडीरत्नागिरी व देवस्थान समिती कार्यालय येथे नियंत्रण कक्ष स्थापन करणे. येथे नायब तहसिलदार दर्जाचा अधिकारी कक्ष प्रमुख म्हणून नेमणूक करणेत यावा. शिवाय प्रत्येक खात्याच्या एका कर्मचा-याची त्या खात्याशी समन्वय साधण्यासाठी नेमणूक करणे आवश्यक आहे.

- गर्दीच्या ठिकाणी म्हणजे सेंट्रल प्लाझा, पायरी मार्ग आणि यमाई मंदीर येथे अव्वल कारकून/मंडळ अधिकारी दर्जाचे अधिकारी पथक प्रमुख म्हणून नेमावेत. दर दोन तासाला त्यांच्याकडून अहवाल घेणेत यावा.

- ग्रामपंचायत कार्यालयातील नियंत्रण कक्षातून जिल्हा नियंत्रण कक्षाशी व पोलीस (कायदा व सुव्यस्था), पोलीस निरीक्षक, अग्निशमनदल-मुख्य अधिकारी, एस.टी. (वाहतूक) मुख्य वाहतूक अधिकारी, तसेच वैद्यकीय अधिकारी व प्राथमिक आरोग्य केंद्र , बी.एस.एन.एल.- एक्स्चेंज यांचेशी कायमस्वरुपी संपर्क साधणेत यावा.

- नियंत्रण कक्षात काम करणारे कर्मचारी व गर्दीच्या ठिकाणी नेमणूक केलेल्या कर्मचा-यांना कार्यालयाकडून फोटो ओळखपत्र देणे आवश्यक आहे.

## पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती, कोल्हापूर -

- **<u>खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे सचिव, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती, कोल्हापूर यांची आहे.</u>**

- पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती यांनी जिल्हा प्रशासनास विश्वासात घेवून यात्रेचे नियोजन व अंमलबजावणी करावी. तसेच, समिती मार्फत यात्रेसंबंधीचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करुन तो जिल्हा प्रशासनास सादर करावा.

- जोतिबा येथील यात्रांचे नियोजन पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती कडून समितीच्या घटनेत नमूद केलेल्या उद्दीष्टानुसारच व्हावे.

- भाविकांच्या गर्दीचा विचार करुन त्यांच्या सुलभ आणि सुरक्षित हालचालींसाठी देवस्थान परिसरात पुरेशी जागा उपलब्ध करुन घेणे व बॅरेकेटींग करुन घेणे आवश्यक आहे.

- जोतिबा मंदिराचा अंतर्गत व बाहय परिसर स्वच्छ व निर्मळ ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करणे. भाविकांमध्ये तशी शिस्तीची भावना रुजवणे या करिता पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती यांनी प्राधान्य द्यावे.

- यात्रेच्या तारखा निश्चित करुन त्या समिती मार्फत वेळीच प्रसिध्द करणेत याव्यात.

- भाविकांच्या येण्या-जाण्याच्या मार्गावरील अतिक्रमणे काढून घ्यावीत. यासाठी स्टॉल्स व दुकानांची संख्या मर्यादित करुन मार्गातील सर्व प्रकारचे अडथळे दूर करावेत.तसेच यात्रेदरम्यान दुकान विक्रेत्याकडून सुके खोबरे वाटीची विक्री न करणे विषयीच्या सूचना देणेत याव्यात. सदरचे खोबरे हे बारीक करूनच विक्रीस परवानगी देणेत यावी अन्यथा अशा दुकानदारांवर कडक कारवाई करणेत यावी.जेणेकरून यात्रा काळात वाटी खोबरे फेकून भाविकांना होणारी इजा अथवा पुढील चेंगरा-चेंगरी सारखा प्रसंग निश्चितच टाळणेस मदत होईल.

- महाद्वार कमानीपासून वर जाणा-या मार्गावरील ठिकठिकाणी तुटलेल्या पाय-या दुरुस्त करुन घ्याव्यात आणि परतीच्या मार्गावरील सर्व उतार काढून त्या ठिकाणी समान मापाच्या व एकसारख्या उंचीच्या पाय-या या किमान महाद्वार पर्यंत तयार करुन घ्याव्यात. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील तज्ञांचे मार्गदर्शन घेवून त्यांचे मार्फत ही दुरुस्ती करुन घ्यावी. त्यासाठी आवश्यक ती रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागास द्यावी व हे काम यात्रेपूर्वी किमान १ महिना अगोदर पूर्ण होणे अत्यावश्यक आहे.

- मंदिर परिसरात भाविकांच्या रांगा लावण्यासाठी व गाभा-यात दर्शन घेतलेले भाविक बाहेर काढण्यासाठी विविध शैक्षणिक संस्था/संघटना, तरुण मंडळे यांच्या मदतीने, स्वयंसेवक नेमावेत. त्यांच्या राहण्याची भोजनाची व मानधनाची व्यवस्था पहावी.

- संपूर्ण यात्रा कालावधीत मंदिर परिसर स्वच्छ ठेवावा. विशेषत: भक्तांच्या पायाखाली निसरडे होणार नाही याची दक्षता घ्यावी.

- मंदिर परिसरात गर्दी नियंत्रणासाठी पोलीसांच्या आराखडयानुसार उभारावे लागणारे अडथळे (बॅरिकेट्स) लाऊन घ्यावेत.

- बंदोबस्त कर्तव्यावरील पोलीस अधिकारी, कर्मचारी व गृहरक्षक यांच्या निवास व भोजन व्यवस्थेसाठी पुरेशी जागा उपलब्ध करुन घ्यावी.

- जिल्हा आरोग्य अधिकारी यांना वैद्यकीय व्यवस्थेसाठी किमान २००० चौ.फु. जागा मंदिर परिसरात उपलब्ध करुन देऊन त्यांच्या मागणीप्रमाणे तेथे पेन्डॉल उभारावेत व आवश्यक फर्निचर व सोयी उपलब्ध करुन द्याव्यात.

- सेवाभावी वैद्यकीय संस्था व संघटनांशी संपर्क साधून त्यांच्याकडुन डॉक्टर्स, नर्सेस, औषधे, वैद्यकीय साधने इ. मिळविणेसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे.

- बेकायदेशीर व नियमबाहय विद्युत जोडणी घेणा-या स्टॉल्स, हॉटेल्स, दुकाने व विक्रेते निश्चित करण्यासाठी समितीकडून ज्या स्टॉल्स, हॉटेल्स, दुकाने व विक्रेते यांना कायदेशीर व नियमानुसार विद्युत पुरवठा करण्यात आला आहे त्यांची यादी तयार करुन ती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास सादर करावी. नियमबाहय वीज वापरास परवानगी देऊ नये.

- यात्रा व मंदिर परिसरात दोन वेगवेगळया ठिकाणी किमान प्रत्येकी दोन अग्नीशामक दल, रुग्णवाहिका व क्रेन सुसज्ज ठेवावेत.

- यात्रा परिसरातील व पंचक्रोशीतील अवैध दारु उत्पादन व विक्री पूर्णपणे निष्प्रभ करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागास अशा उत्पादन व विक्री ठिकाणांची माहिती स्थानिक नागरीक व भाविक यांचेकडुन मिळवून सादर करावी.

- उपहारगृहे व खाद्यपदार्थ विक्री केद्रांना परवानगी देताना त्यांना अन्न व औषध भेसळ विभागाकडील ना हरकत परवाने अनिवार्य आहे.

- श्री जोतिबा मंदिरातील उत्तरेकडील महाद्वार व दक्षिणेकडील प्रवेश दरवाजातून भक्त लोकांना मंदिरामध्ये येण्याकरिता स्वतंत्र प्रवेश मार्ग ठेवणेत यावा. पश्चिमेकडील २ दरवाजातून भक्त लोकांना त्वरीत मंदिराबाहेर जाणेकरिता स्वतंत्र मार्ग ठेवणेत यावा.

- मंदीर व मंदीर परिसर स्वच्छतेसाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेत यावी.

- सदर यात्रेमध्ये नारळ फोडण्याची प्रथा आहे. नारळ फोडण्या करीता हत्तीमहल ओवरी शेजारील ओवरी व त्या समोरील काही भाग दरवर्षी प्रमाणे राखीव ठेवावा.

- मंदीरात येणा-या मुख्य व इतर सर्व मार्गावरील अतिक्रमणे काढून घेऊन यात्रेच्या दरम्यान मंदीर मार्गावरील स्टॉल्स व दुकानांची संख्या मर्यादित ठेवावी.

- मंदीर परिसरातील हत्ती महल ओवरीमधील ४००.स्क्वे.फूट जागा येथील भक्तांना मोफत वैद्यकीय सेवा पुरविणे करीता द्यावी.

- मंदीरातील विज पुरवठा करणाऱ्या केबल्स सर्व जोडण्या यांची विज वितरण कंपनी व सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अभियंते यांचे मार्फत तपासणी करुन घेणेत यावी. यात्रा काळामध्ये विज पुरवठा खंडीत झाल्यास मंदीरात जनरेटरची पर्यायी व्यवस्था करणेत यावी.
- भाविकांनी मंदीरात येताना गोंधळ होऊ नये, त्यांना दर्शन व्यवस्थित मिळावे व गर्दीवर नियंत्रण ठेवणेसाठी मंदीरात व मंदीराबाहेर लोखंडी बॅरेकेटच्या सहाय्याने एकेरी मार्ग करणेत यावा.
- देवस्थान समितीकडून हॉटेल व स्टॉल धारकांस अन्न व औषध भेसळ विभागाचे ना- हरकत परवाने घेणे बंधनकारक करणेत यावे. जेणेकरून खादयपदार्थ घेणेस नियंत्रण ठेवले जाईल.

- मंदीराच्या सुरक्षिततेसाठी मंदीर व परिसरातील हालचालीचे चित्रीकरण करणे करीता देवस्थान कार्यालयाकडून सी.सी.टी.व्ही. सिस्टीम बसविणे आवश्यक आहे. कॅमेरे द्वारे मंदीरातील व परिसरातील चित्रीकरण करणेत येऊन त्यांचे रेकॉर्ड ठेवावे.

## पोलिस विभाग -

❖ **<u>खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे पोलीस प्रशासन यांची राहील.</u>**

- श्री जोतिर्लींग चैत्र पौर्णिमा यात्रेसाठी मोठया प्रमाणात भाविक दर्शनासाठी येत असतात त्यामुळे कायदा व सुव्यस्था सांभाळणे, यात्रा काळात घणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालणे आणि वाहतुकीचे नियंत्रण सांभाळणे याची मुख्य जबाबदारी पोलीस प्रशासनाची आहे.

- जोतिबा डोंगर व परिसरात १) पोलीस चौकी, २) मंदीर परिसर, ३) मंदीरामध्ये, ४) जोतिबा मंदीर ते यमाई मंदीर, ५) यमाई मंदीर परिसर, ६) एस.टी. बस स्थानक, ७) सेंट्रल प्लाझा चौक परिसर, पाण्याची टाकी, अन्न छत्र या ठिकाणी खाकी गणवेशातील व साध्या वेशातील बंदोबस्त नेमणेत यावा.

- उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, सपोनि/फौजदार, पोलीस कर्मचारी,महिला पोलीस कर्मचारी, होमगार्ड पुरुष/ महिला, स्ट्रायकिंग फोर्स, पाच टनी गाडी, क्रेन, बिनतारी संदेश यत्रंणा, वॉकी टॉकी, स्पीकर, आणि बायनाकुलर इत्यादी पोलीस अधिकारी व कर्मचारी आणि साधन सामुग्रीची व्यवस्था करणेत यावी.

❖ **खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे शहर वाहतूक नियंत्रण शाखा यांची राहील.**

- जोतिबा डोंगर व परिसरात पार्किंग व्यवस्था मोटार वाहनांच्या प्रकारानुसार करणेत यावी.

- यात्रा कालावधीत जोतिबा डोंगर मार्गावरील मोटार वाहतूक सुरळीत व सुरक्षीत रहावी या करीता यात्रा मार्गावर प्रत्येक ठिकाणी बंदोबस्त नेमण्यात यावा आणि त्या ठिकाणी राहुटया मारण्यात याव्यात. सदर राहुटयामध्ये दळणवळणाबाबत संपर्क साधण्याकरीता बिततारी संच वायरलेस विभागाकडून उपलब्ध करुन ठेवावेत.

- सदर बंदोबस्ता करीता पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांची नेमणूक करणेत यावी.

- मोटार वाहतुक सुरळीत व सुरक्षीत व्हावी या करीता क्रेन जोतिबा डोंगर व घाटामध्ये ठेवणेत यावी. तसेच देवस्थान समिती व परिवहन महामंडळ यांचे कडून मोठी क्रेन उपलब्ध करुन घेणेत यावी.

**अग्निशमन विभाग**

कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.
मलकापूर नगरपरिषद, मलकापूर.

❖ **अग्निशमन दल अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या:-**

- जोतिबा मंदिराजवळ अग्निशमन दलाचे पथक वाहनासह सज्ज ठेवणे.
- यात्रा काळात बाधीत क्षेत्रामध्ये अडकलेल्या लोकांची सुटका करणे.
- जखमी व्यक्तींना रुग्णालयामध्ये स्थलांतरीत करण्यास प्राधान्य देणे.
- बाधीत क्षेत्रामधून सर्व व्यक्तींचे सुरक्षीत स्थळी स्थलांतर करणे.
- बाधीत क्षेत्रामधील लोकांची विद्युत उपकरणे आणि विद्युत पुरवठा यापासून सुरक्षा करणे.
- तालुका प्रशासनाशी समन्वय साधून, अपघातातील लोकांची सुटका करणे.

- यात्रेमध्ये घडणाऱ्या घटना, तसेच नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांविषयी अग्निशमन नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे.

## जिल्हा परिषद आरोग्य विभाग, कोल्हापूर

❖ **<u>खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे जिल्हा परिषद आरोग्य विभाग कोल्हापूर यांची राहील.</u>**

ग्रामपंचायत जवळील आरोग्य उपकेंद्रामध्ये मुख्य नियंत्रण कंक्ष स्थापन करणेत यावा. यात्रा काळात सर्व आरोग्य विषयक बाबींचे संनियत्रंण करणेची जबाबदारी ही अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी (वर्ग १) यांची राहील.

- उपचार कक्षामध्ये उपचारासाठी आवश्यक पुरेसा औषध साठा उपलब्ध करून ठेवावा. तसेच साथरोग उपचार व सर्पदंशाची लस देखील उपलब्ध करून ठेवणेत यावी.

- उपचार कक्षाच्या बाहेर अत्यावश्यक सेवा म्हणून सर्व सुविधानी युक्त अशा दोन ॲम्ब्युलन्स उपलब्ध करुन ठेवाव्यात.

- वाडीरत्नागिरी येथे पुरविणेत येणारे पाणी आरोग्य विभागाच्या प्रयोग शाळेचे कर्मचारी व ग्रामपंचायत वाडीरत्नागिरी यांचे समन्वयाने पाणी शुध्दीकरण करणे, पाणी नमुने घेणे व तपासणी करणे याची पूर्ण जबाबदारी आरोग्य विभागाची राहील.

- येथे वैद्यकीय अधिकारी, विस्तार अधिकारी (आरोग्य)/आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका, औषध निर्माता, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, वाहने, परिचर, ॲम्ब्युलन्स आणि सी.पी.आर. हॉस्पीटलचे पथक आदी मनुष्यबळ उपलब्ध करुन ठेवणे आवश्यक आहे.

## अन्न व औषध प्रशासन विभाग, कोल्हापूर

❖ **खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे अन्न व औषध प्रशासन यांची राहील.**

अन्न व औषध प्रशासना मार्फत यात्रेमध्ये भाविकांना ताजे, स्वच्छ, व निर्भेळ अन्न पदार्थ मिळावेत यासाठी यात्रेपूर्वी प्रत्येक हॉटेल व स्टॉल, अन्न पदार्थ आस्थापनांच्या तपासण्या करुन आवश्यक तेथे यात्रेपूर्वी एक आठवडा अगोदर नमुने घेणे बाबत संबंधीतांना सुचना देणेत याव्यात.

- यात्रेमध्ये तात्पुरत्या स्टॉल धारक व फिरत्या विक्रेत्यांना ग्रामपंचायतकडून परवाना दिला जातो. ग्रामपंचायतीकडून परवाना देणेपूर्वी महाराष्ट्र अन्न भेसळ प्रतिबंधक नियम १९६२ नुसार स्टॉल धारक व फिरत्या विक्रेत्यांना अन्न परवाना घेणे बाबत सूचना देणे विषयी लेखी कळविणेत यावे.

- यात्रेपूर्वी व यात्रा काळात अन्न पदार्थांची तपासणी करणेसाठी दररोज अन्न निरिक्षकांचे पथक नेमणेत यावे.

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कोल्हापूर

❖ **खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांची राहील.**

- चैत्र पोर्णिमा यात्रेसाठी वीज पुरवठा खंडीत होऊ नये म्हणून महावितरण कंपनी यांचे मार्फत मुख्य वाहिनीचे दुरुस्ती व देखभालीचे काम करुन घेणे आवश्यक आहे. जोतिबा वाहिनीला नैसर्गिक कारणामुळे (उदा.वादळ, वारा, पाऊस, सासनकाठी धडकणे इत्यादी ) बिघाड निर्माण झालेस पर्यायी व्यवस्था म्हणून पन्हाळा उपकेंद्रातील वाहिनीचा जादा पर्याय उपलब्ध ठेवणेत यावा.
- विद्युत सुरक्षे विषयी भाविकांनी घ्यावयाच्या काळजीबाबतचे डिजिटल फलक भाविकांना सहज दिसतील अशा ठिकाणी लावणेत यावेत.
- विजवितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंता वाहिनी कर्मचारी, वीज कर्मचारी, यंत्रचालक इतके मनुष्यबळ उपलब्ध ठेवावेत.

## सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर

❖ **<u>खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे सार्वजनिक बांधकाम विभाग राहील.</u>**

- चैत्र पोर्णिमा यात्रेपूर्वी या विभागाने रस्त्यांची दुरुस्ती करुन सुस्थित ठेवणे आवश्यक आहे.

- दिशादर्शक फलक लावणे, खड्डे भरणे, डेलिनेटर लावणे, साईड पट्टी दुरुस्ती करणे, गटर साफ करणे आणि अपघात प्रवण क्षेत्रात फलक लावणे इत्यादी कामे यात्रेपूर्वी करुन रस्ता सुस्थितीत ठेवणेत यावा.

- वळण रस्ता गायमुख या मार्गावर खड्डे भरणे, दिशादर्शक फलक लावणे, साईड पट्टी दुरुस्ती करुन यात्रेपूर्वी रस्ता सुस्थितीत ठेवणेत यावा.

- यात्रेपूर्वी यमाई मंदीर ते गिरोली रस्ता यात्रा उतरविणेसाठी रस्ता सुस्थितीत ठेवणेत यावा.

## गट विकास अधिकारी पंचायत समिती, पन्हाळा

❖ **<u>खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे गटविकास अधिकारी पंचायत समिती पन्हाळा यांची राहील.</u>**

चैत्र पोर्णिमा यात्रेचे व्यवस्थापन, नियोजन व सनियंत्रण देवस्थान समिती व ग्रामपंचायत स्थानिक यात्रा समिती यांचे मार्फत करणेत यावे.

- ग्रामपंचायतीच्या इमारतीमध्ये सनियंत्रण कक्ष स्थापन करुन ध्वनीक्षेपक बसवणेत यावा.

- यात्रेपूर्वी जोतिबा /वाडीरत्नागिरी येथे ग्रामपंचायती मार्फत टी.सी.एल. पावडरच्या सहाय्याने पाणी शुध्दीकरण करुन पाणीपुरवठा करणेत यावा. त्यासाठी पुरेशा प्रमाणात टी.सी.एल पावडर व २०० किलो तुरटीचा साठा करुन ठेवावा.

- यात्रेसाठी विस्तार अधिकारी आणि त्यांच्या मदतीसाठी इतर कर्मचारी यांची नेमणूक करण्यात यावी.

- यात्रेसाठी विविध ठिकाणी पुरुष व स्त्रीया सांठी स्वतंत्र सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था करणेत यावी. यात्रेसाठी मुतारीची जादा सोय करणेत यावी.
- यात्रा कालावधीमध्ये सर्व ठिकाणी निर्माण होणारे सांडपाणी निर्गत करणेची व्यवस्था गटारी मार्फत करणेत यावी. तसेच कचरा उठाव करुन साफ सफाई करणेसाठी अतिरिक्त कामगारांची ग्रामपंचायती मार्फत नेमणूक करणेत यावी. औषध फवारणीसाठी व बीएचसी पावडर धुरळणी करणेसाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. आरोग्य विभागा मार्फत कंटेनर सर्व्हे करुन टेमिफॉसचा वापर करावा.

- यात्रा मार्गावरील अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींना अतिक्रमण काढून घेणे बाबत ग्रामपंचायती मार्फत नोटीसा देवून यात्रेपूर्वी महसूल व पोलीस यंत्रणेच्या मदतीने ग्रामपंचायती मार्फत अतिक्रमण काढावे.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, कोल्हापूर

❖ **<u>खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची राहील.</u>**

- यात्रेपूवी व यात्राकाळामध्ये पाणी पूरवठा सूरळीत राहणेसाठी असणारी पाईपलाईन, दाबनलिका व वितरण व्यवस्था यांची तपासणी करुन त्यामध्ये काही दोष असलेस तो यात्रेपूर्वी दुरुस्त करुन घेतला घेणेत यावी. तसेच सर्व ठिकाणच्या पंपींग मशिनरीचीही तपासणी केली जावी.

- यात्रेसाठी उपविभागीय अधिकारी, कनिष्ठ अभियंता, पंपचालक व जलसेवक यांची नेमणूक करणेत यावी.

## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर.

❖ **<u>खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, कोल्हापूर यांची राहील.</u>**

- पाणी साठयाबाबत यात्रेपूर्वी जोतिबा /वाडीरत्नागिरी पाणीपुरवठा योजनेची पाहणी करुन कासारी नदीवरील जॅकवेल, बुस्टर व गायमुख येथील पंप सुस्थितीत ठेवणेसाठी तसेच गायमुख तलावात आवश्यक पाणीसाठा करणे बाबत चे नियोजन ग्रामपंचायतीच्या मार्फत करणेत यावे.

- यात्रेसाठी शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, व मुकादम यांची नेमणूक करणेत यावी.

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ , कोल्हापूर

❖ **<u>खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ , कोल्हापूर विभाग यांची राहील.</u>**

- यात्रेपूर्वी व यात्राकाळामध्ये मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वे स्टेशन बसस्थानक, रंकाळा बसस्थानक व पंचगंगा घाट बसस्थानक इ.बसस्थानकावरुन थेट जोतिबा डोंगर अशी जादा वाहतूकीसाठी रा.प. बसेसचे नियोजन करणेत यावे. यात्रेसाठी चांगल्या व सुस्थितीत असणाऱ्या बसेसचा वापर करणेत यावा.

- यात्रा सुरळीत पार पाडणेसाठी जोतिबा बसस्थानक व पंचगंगा घाट या ठिकाणी यात्राकालावधीत २४ तासांसाठी प्रशासकीय, पर्यवेक्षकीय तसेच यांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेत यावी.

पंचगंगा घाट या ठिकाणी सालाबादप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपाचे प्रवाशांच्या सोयीसाठी बसस्थानक उभारण्यात यावे.

- वाहतुकीचा मार्ग विचारात घेता घाट रस्ता असल्याने सुरक्षिततेसाठी व वाहतूक सुरळीत पार पाडणेसाठी यात्रा कालावधीत क्रेनची सोय करणेत यावी.

## राज्य उत्पादन शुल्क विभाग

❖ **<u>खालील जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे राज्य उत्पादन शुल्क यांची राहील.</u>**

- यात्रेच्या निमित्ताने जोतिबा मंदीर व जोतिबा डोंगराकडे येणाऱ्या सर्व मार्गावरील दुकानातून मद्यविक्री बंद ठेवणे बाबत मा.जिल्हाधिकारी हे सक्षम प्राधिकारी असलेने दुकाने बंद ठेवणे बाबत आवश्यकतेनुसार स्वतंत्र टिप्पणी करुन त्यांचे आदेश प्राप्त करुन घेण्यात यावेत आणि त्या प्रमाणे कार्यवाही करावी.

- यात्रा काळात परिसरातील मद्यविक्रीचे दुकानांवर व दारुधंदे विरुध्द विशेष मोहिम राबविण्यात यावी. तसेच निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचे भरारी पथक नेमणेत यावे. यात्रा काळात भरारी पथका मार्फत गस्त घालून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घ्यावी.

---------------------------------------------------------------

## ❍ महत्वाची सुचना ❍

कोणत्याही आपत्तीचे व्यवस्थापन करताना या प्रमाणित कृती प्रक्रियेमध्ये दिलेल्या जबाबदाऱ्या प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांनी योग्य रितीने पार पाडणे अत्यंत आवश्यक आहे.

कोणत्याही शासकीय, निमशासकीय विभागाच्या अधिकारी / कर्मचारी यांनी जाणिवपूर्वक जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला अथवा असे निदर्शनास आलेस तथा अधिकारी / कर्मचाऱ्यांवरती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ - नुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.